(असाधारण)

बुधवार, दिनांक १२ मार्च, २०२५

अधिसूचना

क्रमाक : ३२/२०२५ दिनांकः १२/०३/२०२५

विषयः स्थानिक सुट्टया, २०२५

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आणि संलग्नित / घटक महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सन २०२५ वर्षातील स्थानिक तीन सुट्टयापैकी खालील एक सुट्टी जाहीर करण्यात येत आहे.

उर्वरित दोन सुट्टयांचा स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येईल.

स्थानिक सुट्टया

अ.क्र.	सुट्टीचा दिवस	इंग्रजी तारीख	वार
०१	अक्षय तृतीया	३०.०४.२०२५	बुधवार

टिप :- (१) सर्व संलग्नित महाविद्यालयातील आणि विद्यापीठाचे स्नातकोत्तर शैक्षणिक विभागातील तसेच मॉडेल डिग्री कॉलेज, बुलढाणा येथील शैक्षणिक कर्मचाऱ्यांना (ॲक्डेमिक स्टाफ) फक्त शैक्षणिक नियामिके (ॲकॅडेमिक कॅलेडर) प्रमाणे सुट्या राहतील.

(२) ज्या दिवशी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सुटी असेल, परंतु शैक्षणिक विभागाला सुटी नसेल त्या दिवशी प्राचार्य/विभाग प्रमुख हे शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना उपस्थित राहण्याकरीता सूचना देतील व त्या करीता इतर दिवशी पर्यायी रजा मंजूर करतील, म्हणजे शैक्षणिक कामामध्ये येणाऱ्या अडचणी टाळता येतील.

(३) सदर स्थानिक सुट्या विद्यापीठ परिक्षेत्रातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा व वाशिम या जिल्ह्यांतील सर्व संलग्नित / संचालित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना लागू करण्यात येत असल्याने अमरावती जिल्हा वगळून इतर जिल्ह्यांमधील संलग्नित व संचालित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना संबंधित जिल्ह्यांत जाहीर होणाऱ्या स्थानिक सुट्या लागू राहणार नाहीत.

आदेशान्वये -

स्वा/-

कुलसचिव

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ